# <u>गोषवारा</u>
# <u>2021 ते 2024</u>

द ब्लाइंड वेल्फेअर ऑर्गनाईझेशन ही अंधांकरिता काम करणारी सामाजिक संस्था असून अंधांचा सर्वांगीण विकास व समाज प्रबोधन हे संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच ही संस्था नीती आयोग अंतर्गत नोंदणीकृत असून सामाजिक जागृती आणि दृष्टीहिनांच्या सर्वांगिण विकासासाठी काम करते. संस्थेच्या वतीने अंधांकरिता विविध उपक्रम वर्षभर सातत्याने राबविले जातात यामध्ये पुढील प्रमाणे उपक्रम आहेत.

1. शिष्यवृत्ती योजना: या योजनेअंतर्गत इयत्ता नववी ते एम ए पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो. सन 2021 या वर्षात 112 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली, 2022 मध्ये 137 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली तसेच 2023 या वर्षात 132 तर 2024 मध्ये 156 विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. एकंदरीतच 2021 ते 24 या मागील चार वर्षात एकूण 537 विद्यार्थ्यांनी या संस्थेमार्फत या योजनेचा लाभ घेतला.
2. स्वयंरोजगार: अंध व्यक्तींना रोजगार नसल्याने स्वतःच्या पायावर उभ्या राहण्याकरिता संस्थेमार्फत स्वयंरोजगार अंतर्गत मदत करण्यात येते. अंध व्यक्तींना ही मदत वस्तुरूपात देण्यात येते. 2021 या वर्षात 08 व्यक्तींना मदत करण्यात आली 2022 या वर्षात 08 अंध व्यक्तींना मदत व्यवसायासाठी मदत करण्यात आली आणि 2023 मध्ये 07 व्यक्तींना तर 2024 या वर्षात 05 व्यक्तींना या मदतीचा लाभ झाला मागील चार वर्षात एकूण 28 अंध व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेतला पैकी 10 व्यक्ती या छोटेखाली दुकान घरघंटी सारखे गृह उद्योग तर 13 व्यक्ती रेल्वेमध्ये व्यवसाय करून आपला चरितार्थ चालवतात. मला सांगण्यास आनंद वाटतो की ह्या व्यक्ती स्वतःच्या पायावर उभ्या आहेत.
3. शिक्षण आणि प्रशिक्षण: संस्थेमार्फत अंध व्यक्तींकरिता ब्रह्मानंद संगीत विद्यालय सुद्धा सुरू करण्यात आले आहे. या विद्यालयात अंध व्यक्तींना विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येते जेणेकरून अंध व्यक्ती संगीताची कला अवगत करून संगीत शिक्षक किंवा स्वतःचा ऑर्केस्ट्रा सुरू करून स्वतःच्या पायावर उभे राहू शकतील या विद्यालयात एकूण 25 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
   - अ. संगणक प्रशिक्षण: उपरोक्त संस्थेने अंध व्यक्तींकरिता संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू केला आहे. बोलक्या जॉर्ज सॉफ्टवेअरच्या सहाय्याने अंध व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांना भविष्यात चांगली सरकारी नोकरी मिळू शकेल कोणी मोठ्या कंपनीमध्ये चांगल्या पदावर नोकरी करू शकतील तर कोणी व्यवसायिक होऊ शकेल.
   - आ. निरामय आरोग्य संजीवनी ब्रेल पुस्तिका: डोळस व्यक्ती वाचन, लेखनातून आरोग्यविषयक ज्ञान मिळू शकतात मात्र दृष्टीहीन बांधवांना हे शक्य होत नाही. ब्रेल लिपीतील निरामय आरोग्य संजीवनी या पुस्तिकेतून दृष्टीहीन बांधवांना आरोग्याचे धडे मिळू शकतील व त्यांच्यात जनजागृती होईल. ऑल इंडिया केमिस्ट असोसिएशनचे आप्पासाहेब जगन्नाथ शिंदे यांच्या हस्ते ब्रेल लिपीतील निरामय आरोग्य संजीवनी पुस्तकाचे चे प्रकाशन 08 मे 2022 रोजी करण्यात आले. दृष्टीहीन बांधवांना आरोग्य विषयक सखोल माहिती मिळावी या हेतूने पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. या पुस्तिकेत 20 आजारांची लक्षणे, घ्यावयाची काळजी या विषयी माहिती देण्यात आली आहे. राज्यभरातील दृष्टीहीन विद्यार्थ्यांना व शाळांना ही पुस्तके मोफत देण्यात येतात. त्यामुळे मुलांमध्ये आरोग्य बाबत माहिती मिळेल व ते निरोगी राहण्यास मदत होईल.
   - इ. ब्रेल संस्कार भारती: ब्रेल लिपिचे महत्व दृष्टीहीनांकरिता अतिशय अनन्य साधारण आहे व ते चिरकाळ टिकून राहावे या उद्देशाने संस्थेच्या वतीने ब्रेल संस्कार भारती नावाचे त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. या त्रैमासिकाचा पहिला अंक 15 ऑगस्ट 2022 रोजी नाशिक येथे

वाचकांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आला. यावेळी उपस्थित वाचकांच्या सूचनाही समजून घेतल्या. जेणेकरून या अंकाचा दर्जा उत्तम असल्यास वाचक संख्याही वाढेल.

तर संपूर्ण संगणक व माहिती तंत्रज्ञान आणि संगीत दृष्टी साधना ही पुस्तके कोटक महिंद्रा बँकेच्या सौजन्याने ब्रेल लिपी छापण्यात आली. संगीत दृष्टी साधना या पुस्तकामुळे विशारद अलंकार पर्यंतचा अभ्यास करणे सोयीचे जाईल. तर संपूर्ण संगणक व माहिती तंत्रज्ञान या पुस्तकामुळे एम पी एस सी किंवा स्पर्धा परीक्षा तथा बँकिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. कारण या पुस्तकात संगणकाविषयी सखोल ज्ञान देण्याचा प्रयत्न केला आहे. 3500 रुपयांचा सेट आम्ही सर्व अंधशाळेतील विद्यार्थ्यांना विनामूल्य दिला आहे.

ई. गृहशास्त्र, आरोग्य शास्त्र व शरीरशास्त्र पुस्तक निर्मिती: इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून याचा उपयोग शालांत परीक्षेसाठी असून विद्यार्थ्यांना नवीन संधी यातून मिळू शकते. हे महाराष्ट्रातील ब्रेल लिपीतील एकमेव पुस्तक तयार करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी इस्टेट यांच्या सहकार्याने 15 ऑक्टोबर 2023 रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्री रमेश बैस यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

4. **खेळाडू उपक्रम:** संस्थेमार्फत अंध व्यक्तींकरिता वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात येतात. आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात येते. मैदानी खेळ, बुद्धिबळ आणि क्रिकेट या खेळांच्या स्पर्धा दरवर्षी संस्थेच्या वतीने राबविण्यात येतात.

अ. **बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन:** दि. 17 व 18 मे 2022 रोजी पुणे येथील स्वयंवर मंगल कार्यालयात राज्यस्तरीय झटपट बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातून 100 पेक्षा अधिक स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेत मिलिंद सामंत यांनी प्रथम, द्वितीय मधुकेश राम, तृतीय गायकवाड रितीकेश व उर्वरित स्पर्धकांना देखील सहभागी झाल्याबद्दल भेटवस्तू देण्यात आल्या.

आ. **क्रिकेट स्पर्धेचे आयोजन**: राज्यस्तरीय स्पर्धा तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा दरवर्षी संस्थेच्या वतीने राबविण्यात येतात हे आपणास कळविताना आम्हाला खूपच अभिमान वाटतो. याचे फलित म्हणून 2014 साली विश्वचषक स्पर्धा झाल्या. त्या स्पर्धांमध्ये सात अंध खेळाडूंची निवड झाली होती व ते साऊथ आफ्रिका येथे खेळून आले 2017 साली अंधांचा टि 20 विश्वचषक भारतात झाला त्यातही संस्थेचे सात खेळाडू सहभागी झाले होते. विश्वचषकात आपल्या खेळाडूंची झालेली निवड म्हणजे आपल्या संस्थेने आयोजित केलेल्या स्पर्धा फलित म्हणता येईल व त्याचाच एक भाग म्हणून अजय रेड्डी या अंध खेळाडूला नुकतेच केंद्र सरकारने अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले आहे.

गेल्या 15 वर्षापासून आम्ही राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करीत आहोत. त्यामध्ये भारतातील विविध प्रदेशातील संघ भाग घेत असतात. ज्यामध्ये गुजरात, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश व तामिळनाडू तसेच पंजाब, वेस्ट बंगाल इत्यादी संघ सहभागी होत असतात. आतापर्यंत सर्व राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा मुंबईमध्ये आम्ही दरवर्षी घेत असतो. त्यासाठी आम्हाला ओ एन जी सी, स्टेट बँक, सियाराम ग्रुप, कोटक महिंद्रा बँक, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे क्वीन सिटी तसेच ज्ञात अज्ञात अनेकांचे सहकार्य मिळत असते, अशा या स्पर्धांमुळे वर्ल्ड कप सारख्या खेळात सात अंध खेळाडूंची निवड होते व परदेशात देखील ते खेळायला जातात व विविध देशात अशी चमकदार कामगिरी केल्याचा संस्थेला अभिमान आहे.

सांगायचे तात्पर्य म्हणजे या खेळांमधून सर्व स्पर्धांमधून अनेक अंध खेळाडूंचे भविष्य उदयास आले असे म्हणता येईल.

5. ग्रामीण भागात मोफत नेत्रतपासनी: आपल्या देशात ग्रामीण भागात असलेले दारिद्र्य यामुळे अनेकांना औषध उपचार घेणे देखील शक्य नसते म्हणून संस्थेच्या वतीने अंधत्व निर्मूलनाकरिता ग्रामीण भागात तज्ञ डॉक्टरांच्या सहाय्याने तपासणी करून योग्य तो उपचार केले जातात. या तपासणीमुळे अंध व्यक्तींचा शोधही लागतो. मागील चार वर्षात 8 व्यक्तींच्या मोतीबिंदू व रेटिना यांसारखे शस्त्रक्रिया करून चष्म्याचे वाटप करण्यात आले.
6. उपरोक्त संस्थेमार्फत गरजू व अंध व्यक्तींची विवाह लावून देण्यात येतात त्याचबरोबर त्यांना संसार उपयोगी वस्तूंचे वाटपही करण्यात येते. सन 2021 मध्ये 03, 2022 मध्ये 02 व 2023 मध्ये 2, 2024 मध्ये 02 असे 9 जोडप्यांचे विवाह लावून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले.

संस्था समाज जागृती व्हावी म्हणून ग्रामीण भागात व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम घेत असते. जेणेकरून अंध व्यक्तींना आत्मविश्वास वाढीस मदत होते. अशा पद्धतीने वेगवेगळ्या मार्गांनी संस्था सामाजिक कार्यक्रम घेत असते.

अंध व्यक्तींचा विकास व कल्याणासाठी सतत प्रयत्न करीत असते सांगण्यास आनंद वाटतो की अशा बऱ्याच मान्यवर व्यक्ती आहेत ज्या संस्थेकरीता मदत करीत असतात पण त्यांची नावे घोषित करणे शक्य नाही. मात्र त्यांनी केलेले सहकार्य आम्ही नाकारू शकत नाही.

अरुण मुरलीधर भारस्कर